

(1)

"जपमाळ"

"कसली शोधाशोध चालूयं"
"आहे एक महत्वाची वस्तू"
"मी तर इथंच आहे की,"
"उगीच छळू नको. मी टेंन्शनमध्ये आहे. दिसतयं ना."
"मी काहि मदत करु का?"
"तू तुझं काम कर. हीच मोठी मदत होईल"
"किती पसारा केलाय. नुसती फेकाफेकी करु नका."
"गप्प बस. मला जे पाहीजे ते करणार."
"काम झालं की सगळं आवरुन ठेवायचं."
"बघू."
"तूच तर लपवलं नाहीस ना."
"मी कशाला लपवेन" बोलताना काकू हळू आवरु शकल्या नाही."
तेव्हा काकांची खात्री पटली.
"म्हणजे नक्की तूच!!"
"मोबाईल दे"
"देणार नाही"
"ॲऽ काय म्हणालीस"
"जे ऐकलं तेच"
"चेष्टा खास झाली"
"ऐकवा नाही म्हटलं ना."
"महत्वाच्या कॉल करायच्याय. फोन दे."
"काही महत्वाच्या कॉल नाही. व्हॅटसप नाहीतर रिल्स पहायच्या असतील."
"हे बघ. डोकं फिरवू नकोस."
"तसंही डोकं फिरायला कारण लागतं का? तुमच्या भल्यासाठीच फोन लपवून ठेवलाय."
"माझं भलं मी बघेन. विनाकारण वाकड्यात शिरु नकोस. कळलं."
"एवढं चिडायला काय झालं"
"फोन लपवून वर तोंड करुन विचारतेस. सकाळपासून फोन बघितला नाहीये."
"मग काय आभाळ कोसळलं का दुनिया उलटीपुलटी झाली."

(2)

"माझी झाली. तुला काय करायचंय"

"एवढं ओव्हर रिॲक्ट कशाला होताय."

"होणार, फोन दे"

"दुसरं आयुष्यच नाही का?"

"यावर नंतर बोलू. आधी फोन कुठं ठेवलाय ते सांग."

"सारखा फोन, फोन काय करताय. दारूड्यासारखं वाटतंय."

"आता बास, पेशन्स संपत चाललाय. फोन दे." संतापलेल्या काकांनी रिमोट भिंतीवर फेकला तेव्हा चेहरा लालबुंद झालेला अन हातपाय थरथरत होते. काकांचा आविर्भाव बघून काकूंनी धावत जाऊन आतल्या रूममधून फोन आणून दिला तेव्हा क्षणार्धात काकांचा नूर पालटला. अत्यानंदानं ते आभासी जगात गुंग झाले. क्षणाक्षणाला बदलणारे काकांचे मूडस् बघून थक्क झालेल्या काकू त्यांच्याकडे एकटक पाहत होत्या.

" काय झालं असं काय पाहतेस"

"काही नाही"

"बोल ना!"

"फोन बाजूला ठेवलात तर बोलते नाहीतर जाऊ दे, बोलून काही उपयोग नाही. तुम्हांला काय करायचं ते करा."

"सॉरी!! महाराणी मी जरा विचित्रच वागलो. काय करू. फोनची इतकी सवय झालीय की..."

"सवय नाही गुलाम झाले आहात."

"खरयं!! फोनशिवाय काही सुचत नाही. पुन्हा असं वागणार नाही. प्रॉमीस" गळ्याला हात लावत काका म्हणाले.

"हे अकरावं प्रॉमिस. आयुष्यभर पळापळ केली. रिटायरमेंटनंतर मनासारखं जगण्यासाठी वेळ आहे तर हा फोन सवतीसारखा आयुष्यात आलाय."

"उदाहरण भारी दिलसं" काका हसत म्हणाले.

"हसू नका. चेष्टेचा विषय नाहीये. जरा स्वतःला आवर घाला. सकाळी उठल्यापासून मेसेज फॉरवर्ड करणं सुरू करता. अनेकदा तर तेच ते मेसेज पुन्हा पुन्हा पाठवता. दोनतीनदा संध्याकाळी गुड मॉर्निंगचे मेसेज पाठवलेत. फॅमिली ग्रुपमध्ये सगळ्यात जास्त मेसेजेस तुमचेच असतात. सगळे वैतागलेत पण कोणी बोलत नाही."

(३)

"एवढा त्रास होतो तर गुपमधुन बाहेर पडतो."

"हेच चुकतं. मुद्दा लक्षात न घेता आक्रस्ताळेपणा करायचा. फोनवर बोलताना, फॉरवर्ड करताना वयाचं भान राखावं."

"गप. उगीच काहीही बोलु नकोस. फोनमुळं खुप काम होतात. टाईमपास चांगला होतो म्हणुन जरा..."

"सकाळी फोन मिळाला नाही तेव्हा घर डोक्यावर घेतलतं. त्या नादात डायबेटीस, बीपीची गोळी सुद्धा घेतली नाहीत"

"चुक झाली. साफ विसरलो"

"या स्मार्ट फोनमुळं नवीन प्रॉब्लेम झालाय"

"कोणता?"

"वयस्कर लोकांना रागावताही येत नाही अन् समजवताही येत नाही."

"सॉरी म्हटलं ना. आता सारखं सारखं टोकु नकोस आणि समजेतस इतका फोनच्या आहारी गेलेलो नाही."

"असं प्रत्येकालाच वाटतं. आपली साठी उलटलीय. या वयात असलं वागणं योग्य नाही अन तब्येतीसाठीही चांगलं नाही घरातल्या वडीलधाऱ्यांनी अधिकारानं इतरांना समजावयचं असतं परंतु तेच जर नादी लागले तर परीस्थीती हाताबाहेर जाणारच. ज्येष्ठांमध्ये वाढतं फोनचं व्यसन काळजी करण्यासारखं आहे. स्मार्ट फोनमुळे आजकाल अनेकांच्या हातात ही दिसतच नाही!' हातातली 'जपमाळ' दाखवत काकु म्हणाल्यावर काका काहीही बोलले नाहीत परंतु हातातला फोन मात्र लगेच बाजुला ठेवला.

—x—

मंगेश मधुकर ५/५/२०२५

लेखन - मंगेश मधुकर (मो.) 9822850034

सप्रेम भेट द्यावी अशी वाचकप्रिय पुस्तकं

"संडे डीश" आणि "फुलपुडा"

लेखक - मंगेश मधुकर

प्रकाशक - ग्रंथमन प्रकाशन, पुणे